प्रकरण पाचवे

# 'लोकसखा ज्ञानेश्वर' मधील व्यक्तिरेखा

प्रकरण पाचवे

# 'लोकसखा ज्ञानेश्वर' मधील व्यक्तिरेखा


५.१ प्रस्तावना

५.२ 'लोकसखा ज्ञानेश्वर' मधील पुरुष व्यक्तिरेखा

- ५.२.१ गोविंदपंत
- ५.२.२ विठ्ठलपंत
- ५.२.३ सिद्धोपंत
- ५.२.४ निवृत्ती
- ५.२.५ ज्ञानदेव
- ५.२.६ सोपानदेव
- ५.२.७ हैबती
- ५.२.८ सच्चिदानंदबाबा
- ५.२.९ चांगदेव

५.३ 'लोकसखा ज्ञानेश्वर' मधील स्त्री व्यक्तिरेखा

- ५.३.१ नीराबाई
- ५.३.२ उमाबाई
- ५.३.३ रुक्मिणी
- ५.३.४ मुक्ताई
- ५.३.५ पार्वती

५.४ समारोप

संदर्भ


BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

प्रकरण पाचवे

# 'लोकसखा ज्ञानेश्वर' मधील व्यक्तिरेखा

## ५.१ प्रस्तावना :

सदर प्रकरणात 'लोकसखा ज्ञानेश्वर' या कादंबरीतील मुख्य व गौण अथवा पुरुष आणि स्त्री व्यक्तिरेखांचा अभ्यास करणार आहोत. व्यक्तिरेखा हा कादंबरीतील महत्त्वाचा घटक मानला जातो. तसेच कादंबरीतील आशयसूत्राच्या संदर्भात व्यक्तिरेखांचे स्थान महत्त्वाचे असते. चरित्रात्मक कादंबरी ही समाजातील एखाद्या प्रसिद्ध व्यक्तीच्या संपूर्ण जीवनावर लिहिली जाते. लेखक ज्या व्यक्तीच्या जीवनावर चरित्रात्मक, कादंबरी लिहिणार आहे. त्या व्यक्तीच्या जन्मापासून ते मृत्यूपर्यंतच्या सर्व प्रसंगाची पार्श्वभूमी त्यास ज्ञात असते. त्याचबरोबर त्या व्यक्तिशी संबंधित असणाऱ्या इतर व्यक्ती सुद्धा त्यास माहीत असतात. चरित्रात्मक कादंबरी ही राजकीय, सामाजिक, ऐतिहासिक, पौराणिक, संतविषयक इत्यादी क्षेत्रातील महनीय व्यक्तींच्या जीवनावर लिहिली जाते. त्यामुळे समाजात अशा व्यक्तींना आदर्श मानले जाते. चरित्रात्मक कादंबरीचे कथानक हे मुख्य व्यक्तिरेखेबरोबर दुय्यम व नाममात्र व्यक्तिरेखवरही अवलंबून असते. प्रस्तुत चरित्रात्मक कादंबरीतील व्यक्तिरेखांचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

## ५.२ 'लोकसखा ज्ञानेश्वर' मधील पुरुष व्यक्तिरेखा

### ५.२.१ गोविंदपंत :

गोविंदपंत हे आपेगावातील त्र्यंबकपंत कुलकर्णी यांचे थोरले चिरंजीव असून ते आपेगावचे कुलकर्णीपद सांभाळून आपला उदर-निर्वाह करीत. तसेच आपेगावच्या आसपासच्या पाच गावांचेही कुलकर्णीपद त्यांच्याकडे होते. त्यांच्या पत्नी नीराबाई व मुलगा विठ्ठलपंत असा त्यांचा लहान परिवार होता. त्यांना वयाच्या पंचावन्नाव्या वर्षी नाथकृपेने विठ्ठल हा मुलगा झाला. तसेच त्यांची त्या अगोदरची तीन चार अपत्ये अकालीच गेल्यामुळे त्यांच्या जीवनात असे वाईट प्रसंग घडले. विठ्ठल हा एकुलता एक मुलगा असल्यामुळे त्यांचे सर्व हट्ट व लाड ते आनंदाने पुरवीत होते आणि त्यांच्यावर खूप प्रेम करीत

होते. तसेच त्यांनी त्याला विद्यार्जनासाठी पैठणला पाठविले होते. विठ्ठलाचे बारा वर्षांनी शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी त्यांचा विवाह करावयाचे ठरविले. पण त्यांने विवाहास नकार दिल्यामुळे त्यांना खूप वाईट वाटले.

मात्र पुढे विठ्ठलपंताचा विवाह आळंदीत मोठ्या थाटात झाला. त्यानंतर ते आपल्या पत्नीसह आई-वडिलांना भेटण्यास आपेगावला गेले. तेव्हा त्यांच्या आई-वडिलांना खूप आनंद झाला. तसेच त्यांनी आपेगावातील व आसपासच्या वतनाच्या गावातील मंडळीना आनंदाने भोजन घातले. विठ्ठलपंताचा विवाह होऊन सात वर्षे झाली तरी अपत्यप्राप्ती नसल्यामुळे नातवंडांची वाट पाहून ते वयाच्या चौऱ्याऐंशीव्या वर्षी स्वर्गवासी झाले. अशा प्रकारे शांत स्वभावाची व्यक्तिरेखा सदर कादंबरीत महत्त्वाची आहे.

### ५.२.२. विठ्ठलपंत :

विठ्ठलपंत हे आपेगावच्या गोविंदपंत व नीराबाई यांचा एकुला एक मुलगा असल्यामुळे तो लाडात वाढला होता. तसेच त्याचे लाड व हट्ट पुरविण्यात त्यांच्या आई-वडिलांना आनंद वाटत होता. विठ्ठलपंताचा स्वभाव हट्टी व आग्रही असला तरी ते बुद्धीने तल्लख, वृत्तीने चपळ आणि धाडसी होते. तसेच ते उंच व गौरवर्णी असून त्यांचे डोळे पाणीदार, भेदक व चमकदार होते. त्याचप्रमाणे त्यांची वाणी शुद्ध व स्पष्ट उच्चारांची होती. त्यांचा स्वभाव प्रेमळ व बोलका असल्यामुळे आई-वडिलांचे त्यांच्यावर खूप प्रेम होते.

विठ्ठलपंताचे वयाच्या आठव्या वर्षी मुंज झाल्यावर ते विद्यार्जनासाठी मामा घरी पैठणला गेले. तसेच त्यांचे बारा वर्षांनी शिक्षण पूर्ण झाल्यावर तो आपेगावला परत आला तेव्हा त्यांच्या स्वभावात आमूलाग्र बदल झाला होता. तो आता शांत, एकांतप्रिय व चिंतनशील स्वभावाचे वाटत होता. तर पैठणच्या पाठशाळेत भेटलेले मित्र आपापल्या गावी जाणार असल्याने त्यांना दु:ख वाटत होते.

विठ्ठलपंत दूरदृष्टीचे असल्याने आपेगावाला जाण्यापूर्वी ते आपल्या मित्रांना म्हणतात, ''त्या अटरा विश्वे दारिद्रय भरलेल्या आपेगावात सारं आयुष्य काढायला मला नको वाटतं आहे. त्या गावाला ना रंग, ना रूप, दहा-वीस घरांचं गाव ते सगळी वरकड जमीन पावसाची नेहमी वानवा, नदीकाठ जेवढा पिकतो, तेवढंच गावाच्या पदरात पडतं. अशा ओसाड

गावाचं कुलकर्णी होण्यात आहे काय भूषण ?''[१] अशा प्रकारे तो आपल्या गावाविषयी मित्रांना सांगत होता. ते धर्मशास्त्रात पारंगत होते. तसेच त्यांच्या अंगी नम्रपणा असल्यामुळे जिज्ञासा बुद्धीपोटी अनेक प्रश्न ते आपल्या गुरुंना व पंडितांना विचारत होते. त्याचप्रमाणे आपल्या आई-वडिलांना एक-दोन वर्षे विवाह करण्याची इच्छा नसल्याचे त्यांनी नम्रपणे सांगितले. धार्मिक अध्ययन रीतसर पूर्ण झाल्यावर त्याने देशाटनास जाण्याचे ठरविले. कारण देशाटन केल्याने आपला देश, समाज, संस्कृती, लोक, समाजातील चालीरीती, परंपरा, रूढी इत्यादी पाहता येते. तसेच निसर्ग, वेली, झाडे, पिके, नद्या - नाले, देवदेवळे इत्यादी अनुभवायला मिळते. त्याचप्रमाणे आपण कसे वागावे हेही समजते. म्हणून ते आई-वडिलांची परवानगी घेऊन उत्तरेस देशाटनास गेले.

ते तीर्थाटन पूर्ण करून त्र्यंबकेश्वरहून आळंदीस आल्यावर तेथे त्यांची सिद्धोपंत व त्यांच्या मित्राशी ओळख होते. त्यानंतर ते तीर्थाटनाविषयीचे महत्त्व त्यांना समजावून सांगताना म्हणतात, ''देशाटनामुळं विविध अनुभव तर येतातच. पण जगण्याविषयीची एक वास्तव जाणीवही येते. आपल्या बालसुलभ तारुण्यसुलभ, स्वप्निल कोशातून आपण बाहेर पडू शकतो. खडतर, कष्टाळू, स्वावलंबी आयुष्य जगण्याचे दुर्धर प्रसंग जर ओढवले तर त्यांना आपण तोंड देऊ शकतो की नाही, याचीही सत्त्वपरीक्षा होते. तुमची तुम्हालाच जगण्याची योग्यता कळून चुकते. आपले अनेक भ्रम नष्ट होतात. आपल्या भोवतालच्या गतानुगतिक समाजापेक्षा वेगळं समाज, वेगळं जग आहे, हेही आपणास साक्षात् दिसतं.''[२] अशा प्रकारे त्याने उत्तरेकडील देशाटनात आलेले अनुभव व जगण्याविषयीची जाणीव त्यांना सांगितली.

आळंदीतील सिद्धबेटावर भेटलेल्या सिद्धोपंत कुलकर्णी यांनी त्यांना भोजनास घरी बोलविले होते. त्यावेळी सिद्धोपंताच्या पत्नीने व कन्येने त्यांचे स्वागत केले व सिद्धोपंतानी घरातील असंख्य जुन्या पोथ्या व ग्रंथ काढून त्यांना दाखविल्या. त्यानंतर भोजनाचा कार्यक्रम झाल्यावर सिद्धोपंत व त्यांच्या पत्नीनी त्यांच्या आई-वडिलांची व घराण्याविषयी माहिती विचारली. त्याचप्रमाणे पुढे काही दिवसानी सिद्धोपंतानी आपल्या कन्येशी विवाह करण्यासंबंधी त्यांना विचारले. यावर विचार करून त्याने होकारार्थी निर्णय दिल्यावर वधु-

वरांची कुंडली व गुण बघितले. त्यानंतर विवाहाचा दिवस व मुहूर्त निश्चित करून आळंदी येथे त्यांचा विवाह राजेशाही थाटात पार पडला.

त्यांने आपल्या आई-वडिलांना विवाहास बोलाविले नसल्यामुळे ते पत्नीसह त्यांना भेटण्यास आपेगावला गेले. विठ्ठलपंताचा विवाह होऊन दहा-बारा वर्षे झाली तरी त्यांना अपत्यप्राप्ती नसल्यामुळे ते चिंताग्रस्त व दु:खी झाले होते. अपत्यप्राप्तीसाठी अनेक औषधोपचार, काढे, अर्क पती-पत्नीने घेतले. तसेच व्रते व उपासही केले. पण त्यांचा काहीही उपयोग झाला नाही. म्हणून शेवटी त्यांनी संन्यास घेण्याचे ठरविल्याने ते आपल्या मामाजीस पत्र लिहून ठेवतात आणि आषाढी एकादशीला पंढरीवारीच्या निमित्ताने ते घरातून बाहेर पडल्यावर काशी वाराणशीला संन्यास घेण्यास निघून जातात.

एके दिवशी काशी-वाराणशीचे प्रख्यात विद्वान संन्यासी रामानंदस्वामी रामेश्वराच्या यात्रेला जात असताना आळंदी तीर्थाची ख्याती ऐकून तेथे येतात. त्यावेळी रुक्मिणी मैत्रिणीबरोबर स्वामीच्या दर्शनास जाते. तेव्हा आपल्या पतीसंबंधीची सर्व नाहिती ती स्वामीना सांगते. त्यानंतर ती स्वामींच्या मदतीने आपल्या पतीस संन्यासाश्रमातून परत आळंदीस घेऊन येते. आळंदीत आल्यावर चार-पाच दिवसांनी सिद्धेश्वरांच्या मंदिरात 'धर्मसभा' आयोजित केली जाते. तेव्हा संन्यास घेऊन उलट दिशेने गृहस्थाश्रमात प्रवेश करता येत नसल्याने ही धर्मसभा त्यांच्यावर बहिष्कार टाकते आणि त्यांना प्रायश्चित म्हणून समाजापासून दूर राहून 'बहिष्कृत' असे जीवन जगण्यास सांगते. असा निर्णय त्या धर्मसभेत घेतला जातो. त्यानंतर विठ्ठल - रुक्मिणी सिद्धबेटावर झोपडी बांधून राहतात. त्यावेळी तेथे त्यांना निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान व मुक्ताई अशी चार मुले होतात. ही मुले मोठी झाल्यावर त्यांची मुंज करण्यास आळंदी क्षेत्रातील ब्राह्मणवृंदापैकी कोणीही तयार नसते. संन्यासाच्या मुलांची मुंज करता येत नाही. तसेच विठ्ठलपंतानी देहांत प्रायश्चित घेतल्यावरच त्यांच्या मुलांच्या मुंजीचा विचार केला पाहिजे. असा निर्णय शेवटी धर्मसभेने दिला. म्हणून त्यांनी आपल्या मुलांच्या भवितव्याचा विचार करून देहांत प्रायश्चित घेण्यासाठी पती-पत्नी दोघे आळंदीहून प्रयागतीर्थाला निघून जातात. अशाप्रकारे विठ्ठलपंत ही व्यक्तिरेखा या कादंबरीत अत्यंत महत्त्वाची आहे.

### ५.२.३. सिद्धोपंत :

सिद्धोपंत कुलकर्णी हे आळंदी गावचे प्रतिष्ठित ब्राह्मण असून त्यांच्याकडे आळंदीच्या आसपासची पंचवीस वतनाची गावे होती. तसेच त्यांचा आळंदीमध्ये एक मोठा वाडा असून तो ब्राह्मणांपैकी सर्वात जुना होता आणि त्या वाड्यामध्ये त्यांच्या वडिलांनी अनेक जुने ग्रंथ व पोथ्या जतन करून ठेवल्या होत्या. त्यांच्याकडे परगावची अनेक माणसे कामानिमित्ताने येत असल्याने त्यांच्या राहण्याची व भोजनाची सर्व व्यवस्था ते करीत होते. तसेच एक आदर्श व्यक्ती म्हणून समाज त्यांच्याकडे पहात होता.

एके दिवशी सिद्धबेटावर त्यांना विठ्ठलपंत भेटले आणि त्यांच्याशी ओळख झाल्यावर त्यांना भोजनासाठी ते घरी घेऊन आले. घरी आल्यावर त्यांच्या पत्नीने व कन्येने त्यांचे स्वागत के ले आणि भोजनाचा कार्यक्रम झाल्यावर त्यांनी विठ्ठलपंताची संपूर्ण चौकशी केली. पुढे काही दिवसांनी त्यांनी आपल्या कन्येचा विवाह त्यांच्याशी मोठ्या थाटात करून दिला. तसेच या विवाहास त्यांनी आळंदी व आसपासच्या वतनाच्या गावातील मंडळीना निमंत्रण दिले होते. विवाहानंतर काही दिवसांनी ते घरातील सर्व मंडळीना घेऊन जावायाच्या आई-वडिलांना भेटण्यास आपेगावला आहेर घेऊन गेले.

रुक्मिणीचा विवाह होऊन सात-आठ वर्षे झाली. तरी अपत्यप्राप्ती नसल्याने ते चिंताग्रस्त झाले होते. आपल्या एकुलत्या एक मुलीवर ते खूप प्रेम करीत होते. तसेच त्यांनी अपत्यप्राप्ती होत नसल्याने संन्यास घेतल्यावर ते खूप दु:खी झाले होते. त्यानंतर सहा वर्षांनी रामानंद स्वामीच्या मदतीने जावायास संन्यासाश्रमातून त्यांनी परत आणले आणि आळंदी व आसपासच्या गावातील लोकांना मावंद्याचे भोजन घातले. त्यानंतर काही दिवसांनी आळंदीतील धर्मसभेने जावायास 'बहिष्कृत' केल्यावर त्यांना ब्राह्मणमंडळीचा राग आला होता. तसेच ते गंभीरही झाले होते. तसेच नातवंडांची मुंज करण्याविषयी ते त्यांना असे म्हणतात, ''जगलो वाचलो तर माझ्या या नातवंडांची मुंज मी इथं नाही, तिथं पैठणात जाऊन करीन पैठणात नाही जमलं तर शेवटी निर्वाणीचा उपाय म्हणून काशी विश्वेश्वरास जाऊन करीन. तेथील पुरोहित आनंदानं करतील''[३] अशाप्रकारे ते आत्मविश्वासाने त्यांना

सांगत होते. पण त्यांनी मुलांच्या मुंजीसाठी केलेले प्रयत्न आळंदीच्या ब्राह्मणमंडळीमुळे यशस्वी झाले नाहीत.

**५.२.४. निवृत्तिनाथ :**

निवृत्तिनाथ हे विठ्ठल-रुक्मिणी यांचे जेष्ठ पुत्र असून ते दिसण्यास पितृमुखी होते. तसेच ते शांत, जिज्ञासू व चिंतनशील स्वभावाचे असून त्यांना त्यांची भावंडे 'नाथदाद' असे म्हणत होते. त्याचबरोबर ते ज्ञानदेवांचे गुरू होते. त्यांचे 'निवृत्ती' हे नाव ठेवण्यामागील भूमिका विठ्ठलपंत पुढीलप्रमाणे सांगतात, ''कर्मकांडांनी भरलेल्या तथाकथित श्रेष्ठ वर्णाच्या जातीतून त्यांनी प्रत्यक्षात नसली तरी मनाने निवृत्ती घेतली. म्हणून पहिला 'निवृत्ति'[४] असे प्रथम जन्मलेल्या मुलाचे अर्थपूर्ण नाव त्यांनी ठेवले होते.

विठ्ठल-रुक्मिणी हे आपल्या चारी मुलांना घेऊन त्र्यंबकेश्वरला गेले होते. त्यावेळी वडिलांच्याबरोबर तो व ज्ञानदेव ब्रह्मगिरीची प्रदक्षिणा पूर्ण करून खाली येत असताना वाटेत अचानक वाघ आल्याने तो तेथून पळून गेला आणि त्यांने तेथे असलेल्या मठाचा आश्रय घेतला. दुसऱ्या दिवशी मठातील सिद्धकाकाच्या मदतीने तो आई-वडिलांच्याकडे आला आणि त्याने तेथे घडलेल्या सर्व प्रसंगाची सविस्तर माहिती सर्वांना सांगितली. त्यानंतर नाथसंप्रदायाची दीक्षा घेऊन तेथील मठात ते सहा महिने राहिले. तसेच त्याने आपल्या तल्लख बुद्धीने आणि एकाग्र साधकवृत्तीने बरेच ज्ञान आत्मसात केले. यामुळेच ते नाथसंप्रदायाचे वाङ्मय अभ्यासायला समर्थ झाले होते. ते गहिनीनाथाकडून ब्रह्मबोध झाल्याचे आणि योगमार्गाची दीक्षा घेतल्याचे पाहून विठ्ठलपंत आनंदीत झाले होते.

आई-वडिलांप्रमाणे ते आपल्या भावंडांवर प्रेम करीत होते. विठ्ठलपंतांनी देहांत प्रायश्चित घेतल्यावरच त्यांच्या मुलांच्या मुंजी करण्यात येतील. असा निर्णय त्यांना आळंदीच्या धर्मसभेने दिला होता. तेव्हा ते आपल्या वडिलांना असे म्हणतात,''बापू, आम्हाला आमच्या मुंजी नको आहेत. आम्हाला तुम्ही हवे आहात. आपण ही आळंदी सोडून दुसरीकडं कुठेही जाऊ. फार तर आपेगावला जाऊन राहू. तुम्ही म्हणाल तर पंढरपूरला जाऊन तीर्थक्षेत्री जीवन कंठू''[५] अशाप्रकारे त्यांने आपल्या पित्यास दु:खी अंत:करणाने सल्ला दिला होता. पण आपल्या मुलांच्या भवितव्याचा विचार करुन त्याच्या आई-वडिलांनी

देहांत प्रायश्चित घेतले. या प्रसंगामुळे ते खूप दु:खी झाले होते. पण त्यांनी स्वत:ला सावरुन आपल्या भावंडांनाही धीर दिला.

आळंदीतील ब्राह्मण मंडळीनी ज्ञानदेवांदि भावंडांची मुंज करण्यास नकार दिल्यावर ते भावंडांना घेऊन पैठणला गेले. तेव्हा तेथील धर्मसभेने संन्यासाच्या मुलांच्या मुंजी करता येत नाहीत. असे सांगून त्यांना एक शुद्धिपत्र दिले. तेव्हा ते स्वीकारताना त्यांनी सभेसमोर आनंदाने पुढील उद्‌गार काढले. ''आपल्या या निर्णयाचा आम्ही सर्व भावंडे आनंदाने स्वीकार करीत आहोत. आपल्या अपेक्षांनुसारच आमचं आयुष्यभर आचरण राहील, अशी मी ग्वाही देतो. राम कृष्ण हरी ! राम कृष्ण हरी ! शिवो ऽ हं ! शिवो ऽ हं !''[६] आपल्या भावंडांना कसे वागायचे व बोलायचे हे त्यांनी सांगितले होते. तसेच आपल्या वडिलांचे आपेगावातील पडक्या घराची अवस्था पाहून इतर भावंडांप्रमाणे ते खूप दु:खी झाले होते. नेवासे येथे भावार्थदीपिकेचे लेखन पूर्ण झाल्यावर ज्ञानदेवांनी तो त्यांच्यासमोर ठेवून त्यांचा आशीर्वाद घेतला. एके दिवशी आळंदीतील विसोबा चाटी भगवद्‌गीता प्राकृतात लिहिल्याबद्दल ज्ञानदेवास रागवले. तसेच ते त्यांनाही ही रागवल्यावर तो त्यांना पुढीलप्रमाणे म्हणाला, ''काका, आम्ही कानफाटे नाही. ती वेगळी शाखा आहे. आम्ही अनुयायी नाही. आम्ही मूळ नाथसंप्रदायाचे आहोत. या संप्रदायात गुरूला अतिशय महत्त्व आहे. मनाची शुद्धता, मनाचे दृढता, विकारांचा अभाव, गर्वहीनता, धैर्यशील, सदाचरण, खाण्यापिण्यात मध्यम मार्ग, ब्रह्मचर्य इत्यादी गुणांना अतिशय महत्त्वच आहे. आमच्या पंथात मादक वस्तूंचं सेवनं करणारा नरकात जातो. असं मानलं जातं. आम्ही सगुण निगुर्णाच्या पलीकडचे आहोत. सदानंद देवता, हे आमचं साध्य आहे. ही देवता अद्वैताच्याही वरच्या पातळीवरची आहे. तिचे आम्ही साधक आहोत. शिवशक्तीचं आम्ही अद्वैत मानतो.''[७] अशाप्रकारे त्यांनी शांतपणाने त्यांना समजावून सांगितले. त्यानंतर काही दिवसांनी ज्ञानदेवास स्वतंत्र ग्रंथ लिहिण्यास त्यांनी विनंती केली.

उत्तरेस तीर्थयात्रेचा प्रवास करण्यास त्यांनी ज्ञानदेवास अनुमती दिली. तसेच तीर्थयात्रा केली तर माणूस अनुभवी होतो. त्याचबरोबर तो आपल्या कोशातून बाहेर पडून जगाचा, विश्वाचा आणि समाजाचा विचार करु शकतो असे त्यांनी तीर्थयात्रेचे महत्त्व त्यांना

सांगितले. त्यानंतर काही दिवसांनी संत मंडळीना बरोबर घेऊन चारी भावंडांनी उत्तरेस तीर्थयात्रेचा प्रवास केला.

त्यांनी ज्ञानदेवांना संजीवन समाधी घेण्यास परवानगी देऊन त्यांना आशीर्वाद दिला. तसेच संतमंडळी समाधीच्या दिवशी सिद्धबेटावर आल्यावर त्यांचे मनापासून त्यांनी स्वागत केले. त्याचबरोबर ज्ञानदेव समाधिस्थानात प्रवेश करण्यापूर्वी त्यांनी त्यांना मिठी मारली आणि त्यांच्या डोळ्यातून अश्रू आले. त्यानंतर त्यांनी समाधिस्थानात तयार केलेल्या आसनावर त्यांना बसविले आणि तेथून हुंदके देत ते बाहेर पडले. शेवटी समाधीचे द्वार कायमचे बंद करून त्यांनी समाधीला नमस्कार केला. शांत, जिज्ञासू, चिंतनशील, प्रामाणिकपणा, निर्णय घेण्याची क्षमता इत्यादी वैशिष्ट्यांमुळे निवृत्तिनाथ ही व्यक्तिरेखा लक्षात राहते.

### ५.२.५ ज्ञानदेव :

ज्ञानदेव हे सदर कादंबरीतील एक महत्त्वाची व्यक्तिरेखा असून ते विठ्ठल-रुक्मिणी यांचे द्वितीय पुत्र होते. ते दिसण्यास मातृमुखी असून त्यांना सर्वभावंडे 'देवदादा' असे म्हणत होते. त्यांची वाणी मधुर, कोमल व नम्र होती.

आळंदीच्या धर्मसभेने दिलेल्या निर्णयानुसार त्यांचे आई-वडील देहांत प्रायश्चित घेण्यास काशी-वाराणशीस निघून गेल्यावर ते खूप दु:खी झाले होते. पुढे काही महिन्यांनी आळंदीतील ब्राह्मण मंडळीनी ज्ञानदेवादि भावंडांची मुंज करण्यास नकार दिल्याने ते त्यांना घेऊन पैठणला गेले. तेव्हा तेथील धर्मसभेत ते पुढीलप्रमाणे विनंती करतात, ''आम्ही अनाथ झालेली मुलं आहोत. आचारधर्मानुसार पतित झालेलो असलो तरी धर्मपीठास शरण आलेलो आहोत. दीन अशा आम्हा भावंडांचा आपण सहानुभूतीने विचार करावा, धर्माची कृपादृष्टी आमच्यावर असावी. धर्माच्या आधारे आम्हांला पावन करून घ्यावे. आपण वेदशास्त्रसंपन्न पंडित आहात, श्रुतिस्मृतींचे आचार्य आहात, धर्मशास्त्रांचे जाणकार, अनेक धर्मसूत्रांचे अभ्यासक, महाउपाध्याय, ऋषितुल्य साधक, शास्त्रज्ञ आहात तरी धर्माचार आणि शास्त्राधार शोधून उपनयन विधीसाठी आपण धर्मपीठस्थानी आम्हाला शुद्ध आणि सनाथ

करून पदरात घ्यावे.''[८] अशाप्रकारे त्यांनी नम्रपणे धर्मसभेतील मंडळीना विनंती केली. तेव्हा धर्मसभेने संन्याशाच्या मुलांची मुंज करता येत नाही असा निर्णय त्यांना दिला.

त्यानंतर ते तेथील धर्मशाळेत काही दिवस राहिले आणि तेथील लोकांना श्राद्ध विधीची माहिती व महत्त्व सांगितले. तेथे त्यानी मूलधर्मतत्त्वावर तीन दिवस प्रासादिक भाषेत प्रवचने दिल्यामुळे लोक त्यांना परमेश्वरांचेच अवतार समजत होते. तेथूनच ते भावंडांसह आपल्या वडिलांच्या घरी आपेगावला गेल्यावर त्या पडक्या घराची दुरावस्था पाहुन त्यांच्या डोळ्यात अश्रू आले. तसेच त्यांनी त्या घराचे व जागेचे दानपत्र करून तेथील पाटलांच्या स्वाधीन केल्यानंतर ते नेवसेच्या धर्मशाळेत राहण्यास गेले. तेव्हा त्या गावच्या पाटीलानी ज्ञानदेवांदि भावंडांची चौकशी करण्यास सच्चिदानंदबाबास सांगितले होते. म्हणून ते दररोज त्यांची चौकशी करीत होते. पण एकेदिवशी त्यांच्या पोटात दुखू लागल्यामुळे ते जमीनीवर पडले आणि ते मेल्याची बातमी एका पुजाऱ्यानी त्यांना सांगितल्यार ते निवृत्तीला घेऊन त्यांच्याघरी गेले. तर दारातच त्यांचे प्रेत पांढऱ्या वस्त्राने पांघरलेले दिसल्यावर ते जवळ गेले. तेव्हा त्यांचे शरीर गरम असल्याचे जाणवल्यावर त्यांनी ते वस्त्र बाजूला करून त्यांच्या हातापायाला खोबरेल तेल लावून मनातल्या मनात मंत्र पुटपुटले. तेव्हा थोड्या वेळांनी त्यांनी डोळे उघडल्यावर लोकांनी त्यांचा जयजयकार केला.

नेवासे येथे एकांतात राहून चिंतन आणि मनन ते ग्रंथाध्यायनासाठी करीत होते. तसेच तेथील पंचक्रोशीतील लोकांची एकत्र सभा घेऊन श्रीकृष्णाने अर्जुनाला सांगितलेली भगवद्गीता ते लोकांना मराठीत सांगत होते. त्याचबरोबर या ग्रंथाचे अठरा अध्याय लिहून पूर्ण झाल्यावर त्यांनी या ग्रंथास 'भावार्थदीपिका' असे नाव दिले आणि हा ग्रंथ गुरू निवृत्ति नाथाच्या आज्ञेनुसार पूर्ण केल्याचे त्यांनी सांगितले. नेवासे येथे सव्वा वर्षे राहिल्यानंतर ज्ञानदेवांदि भावंडे आळंदीकडे बैलगाडीने प्रवास करीत जात होते. तसेच त्यांच्यासोबत पैठणच्या धर्मसभेत 'वेद' म्हटलेला रेडा होता. पण तो म्हातारा झाल्याने प्रवास करताना खूप थकला होता. म्हणून 'आळे' या गावी ते वस्ती राहतात. पण त्याच रात्री रेड्याने जीव सोडला हे समजल्याने ते पटकन उठून त्याच्याजवळ गेले आणि त्यांच्या मस्तकाला स्पर्श करुन नमस्कार केला. तसेच त्यांनी त्या गावातील माणसे मदतीला घेऊन त्याच्यासाठी खोल

खड्डा काढून त्यात तळाला वाळके गवत पसरले. त्यानंतर त्यांनी तेल लावून त्याला आंघोळ घालून शेंदूर लावला. तसेच पूजा झाल्यानंतर त्यास त्या खड्यात सोडून त्यांच्या मुखात भाकरी व गवताचा घास घातला. हे सर्व करीत असताना त्यांच्या डोळ्यात अश्रू येत होते. शेवटी त्यांनी आपल्या अंगावरील पासोडी त्याच्या अंगावर घालून त्यास फुले वाहिली आणि मंत्र म्हणून झाल्यावर त्याला मूठमाती दिली. त्याचे उत्तर कार्य झाल्यावर सर्वांनी स्नान केले आणि तेथील काही गावकऱ्यांबरोबर त्यांनी एकत्र भोजन केले. हा महिष बंधू पैठणच्या धर्मसभेच्यावेळी आपल्या मदतीला धावून आल्याचे आठवल्याने ते दु:खी झाले. माणसाइतकेच मुक्या प्राण्यावरही ते प्रेम करीत होते.

त्यानंतर ते आळंदीतील सिद्धबेटावर पोहोचल्यावर आसपासच्या गावातील लोक त्यांना आग्रहाने प्रवचने, निरुपण सांगण्यास बोलविल्यावर 'भावार्थदीपिके' मधील काही निवडक विषयांवर ते सांगत होते. एके दिवशी विसोबा काकासह काही मंडळी आळंदीतील पिंपळपारावर गप्पा मारत बसले होते. तेथूनच ते व निवृत्ती जात असताना त्यांच्याशी विसोबा चाटीने 'भावार्थ दीपिके' विषयी चौकशी करुन ती प्राकृत भाषेत लिहिल्याबद्दल त्यांना शिव्या देऊन अपमानित केले. म्हणून ते सिद्धबेटावर येऊन कुटीला ताटी लावून आतमध्ये दोन दिवस झोपले होते. पण तिसऱ्या दिवशी मुक्ताने ताटी उघडा 'देवदादा' असे रडत म्हटल्यामुळे ती त्यांनी उघडली आणि तिला मिठीत घेतले. तेव्हा त्यांच्या शरीरात खूप ताप असल्याचे तिला जाणवले. तसेच तो कमी होण्यासाठी त्यांच्यापाठीवर तिने मांडे भाजले आणि तो कमी झाल्यावर आपण कसे आजारी पडलो हे त्याने सर्वांना सांगितले.

गुरू निवृत्तिनाथाच्या आज्ञेप्रमाणे त्याने स्वतंत्र ग्रंथलेखन करण्याचे ठरविले होते. त्यानुार त्यांनी 'अमृतानुभव' हा लहान ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ लहान असला तरी त्याचा आशय महान होता. तसेच या ग्रंथाचे वाचन आळंदीतील सिद्धेश्वराच्या मंदिरात ते सात दिवस करीत होते. त्यानंतर हा ग्रंथ आषाढी वारीला पंढरपुरला नेऊन विठ्ठल चरणी त्यांनी अर्पण केला आणि या ग्रंथनिर्मितीमुळे त्यांना व त्यांच्या भावंडास आनंद झाला होता.

ज्ञानदेवांची कीर्ती ऐकून त्यांना भेटण्याची इच्छा हटयोगी चांगदेवास झाल्यावर त्याने पत्र लिहिण्याचा निर्णय घेतला. पण वयाने लहान व अनुभवाने मोठ्या असल्याने त्यांना

चिरंजीव की तीर्थरूप असा मायना लिहावा हा प्रश्न पडल्याने ते पत्र कोरेच त्यांने शिष्याद्वारे पाठविले. पुढे त्यांनी त्या पत्रास दिलेले उत्तर म्हणजे 'चांगदेव पासष्टी' हा ग्रंथ होय. त्यानंतर ते त्यांना भेटण्यास आळंदीस आल्यावर त्यांचा स्वभाव, सात्त्विक, नि:स्वार्थ व अफाट कर्तव्य बुद्धी पाहून त्यांचा अहंकार कमी झाला आणि त्यांच्या स्वभावात आमूलाग्र बदल झाला.

तीर्थयात्रेस जाण्याची इच्छा ते आपल्या भावंडांजवळ पुढीलप्रमाणे व्यक्त करतात, ''आतापर्यंत आपण आपल्या पंचक्रोशीत फिरलो. महाराष्ट्र प्रदेशाच्या बाहेर गेलो नाही. मराठी माणसं, मराठी समाज, शेतीमाती, तीर्थक्षेत्र, नद्या निसर्ग थोडाबहुत पाहिला. त्याची थोडी कल्पना आली. पण ही भरतभूमी असेतुहिमालय पसरली आहे. विशाल आहे. तिचा धर्म, उपधर्म, पंथ, संस्कृती, तीर्थक्षेत्र सनातन असली तरी अनेक आहेत. विविध प्रदेशांतील निसर्ग वेगवेगळे आहेत. डोंगर नद्या, माणसे, समाज विविध गुणधर्मांनी, रूप स्वरूपांनी नटलेल्या आहेत. असंख्य देवदेवतांची मंदिर, प्रसाद, प्रदेश सर्वत्र विखुरलेले आहेत. त्यांच्या विविध तऱ्हा विविध स्वरूपं, विविध मुद्रा पाहण्यासारख्या अनुभवण्यासारख्या आहेत. यासाठी आपण जर उत्तरेत तीर्थयात्रा केली तर आपली मनं पुन्हा विविध अनुभवांनी, विचारांनी, नव्या प्रेरणांनी भरुन येतील, परिणामी विशाल होतील. परमेश्वराच्या सुंदरतेबरोबरच मातृस्थानी असलेल्या आपल्या भरतभूमीची विशालता, भव्यता आणि पवित्रताही आपणास प्रत्यक्षात अनुभवता येईल.''[९] अशा प्रकारे तीर्थयात्रेस जाण्यामागील हेतू त्यांनी सांगितल्यावर भावंडांनी त्यांना प्रतिसाद दिला. तसेच पंढरपुरात कार्तिकी वारीला त्यांनी वारकरी संप्रदायातील संताना तीर्थयात्रेस येण्याची विनंती केली होती. त्यानुसार एका शुभमुहूर्तावर त्या सर्वांनी तीर्थयात्रेच्या प्रवासास सुरुवात केली. त्यामध्ये प्रामुख्याने ज्ञानदेवादि भावंडे, नामदेव सावतामाळी, चोखा मेळा, नरहरी सोनार, बंका महार, गोरा कुंभार इत्यादी वारकरी संत त्यामध्ये सामील झाले होते. तसेच पंढरपूर, नेवासे, आळंदी, त्र्यंबकेश्वर, नाशिक, द्वारका, मथुरा, प्रयाग, काशी, वाराणशी इत्यादी धार्मिक क्षेत्राला भेट देऊन संतमेळा परत पंढरपुरात आला. तेव्हा तेथे भोजनाचा कार्यक्रम झाल्यावर ते तीर्थयात्रेविषयी आपले मनोगत असे व्यक्त करतात, ''तीर्थयात्रा जेव्हा सुरू

झाली तेव्हा अनेक अडचणी निर्माण होतील, असं वाटलं. त्यामुळं माझ्या मनावर जबाबदारीच एक दडपण आल, मनात अनेक शंका, संशय आणि विकल्प आले. विपरीत प्रसंग आले, तर त्याची नैतिक जबाबदारी आमच्यावरच पडणार आणि आपण तर अनुभवी मग काय करायचं ? झेपेल का आपणाला ? कुणी आजारी पडलं, कुणाला काही अनवधानानं अपघात झाला, तर काय करायचं, अशी चिंता वाटत होती. पण परमेश्वरकृपेनं आपण सर्वजण सुखरुपपणे परत आलो. आम्ही एका जबाबदारीतून आणि कर्तव्यातून यशस्वीपणे पार पडलो. याची मला फार मोठी धन्यता वाटली.''[१०]

तीर्थयात्रा करून आल्यावर त्यांनी काही अभंग लिहिले. एके दिवशी त्यांनी चिरस्वरूपाची संजीवन समाधी घेण्याविषयी निवृत्तीशी चर्चा केली आणि त्यांनी अनुमती दिल्यावर त्यांच्या चरणावर मस्तक ठेवून त्याने आशीर्वाद घेतला. समाधी घेण्याच्या दिवशी त्यांची सर्व भावंडे, हैबती व त्यांच्या कुटुंबातील स्त्री-पुरुष, आळंदीच्या पंचक्रोशीतील अनेक लोक आले होते. तसेच पंढरपुरहून गोरा कुंभार, संत नामदेव, जनाबाई, बंका महार, नरहरी सोनार, सावता माळी, सेना न्हावी इत्यादी संत आळंदीत एकत्र आले होते. तेव्हा या सर्व मंडळीचे स्वागत त्यांनी मनापासून केले.

कार्तिक वद्य त्रयोदशीच्या सकाळी त्यांनी इंद्रायणीत स्नान करून सिद्धेश्वर मंदिरात जाऊन शिवदर्शन घेतल्यानंतर एका वैद्याने त्यांच्या अंगाला वनौषधीचा लेप व व चंदनाची उटी लावली. ही प्रक्रियापूर्ण झाल्यावर घरातील स्त्रियांनी त्यांना पंचारतीने ओवाळून मांड्याचा एक घास भरवताना त्या स्त्रियांच्या डोळ्यातून अश्रू येत होते. तसेच सोपान, मुक्ताई, हैबतीच्या कुटुंबातील स्त्रिया रडत होत्या. तर काही लोक त्यांच्या पायाना नमस्कार करीत होते. तसेच थोड्या वेळाने सर्वांनी त्यांचा जयघोष करण्यास सुरुवात केली. त्यानंतर त्यांनी समाधिस्थानाला तीन प्रदक्षिणा घातल्यावर वाद्ये वाजविण्यात आली आणि शेवटी त्यांनी जनतेला त्रिवार वंदन करून समाधिस्थानात प्रवेश करतेवेळी निवृत्तिनाथास मिठी मारुन पुढीलप्रमाणे म्हणाले, ''गुरुनाथदादा, तुमच्या दिव्य मार्गदर्शनामुळंच माझ्या जीवनाचं सार्थक झाल, माझ्या जीवनाला अर्थपूर्णता प्राप्त झाली. शिकविलेला ज्ञानाचा आणि तत्त्वज्ञानाचा हा शेवटचा आचार स्वीकारण्याचं परमेश्वरी सामर्थ्य प्राप्त झालं. आता मी पूर्ण-विराम घेत

आहे. ओम शांति : शांति :''[११] अशाप्रकारे त्यांनी भावना व्यक्त करुन समाधिस्थानात प्रवेश केला.

थोडक्यात ज्ञानदेव हे शांत स्वभावाचे, कुशाग्रह बुद्धीचे आणि सात्त्विक वृत्तीचे होते. तसेच मुक्या प्राण्यावर प्रेम करणारे, रेड्यामुखी वेद वदविणारे, चांगदेवांचा अहंकार नाहीसा करणारे, वारकरी संप्रदायाचा पाया घालणारे, पंढरपुराच्या विठ्ठलाचे भक्त असल्याने वारी करणारे, संताना आध्यात्मिकतेची शिकवण देणारे, तीर्थयात्रा करणारे, स्वत:ला जे पटेल ते करणारे व नंतर इतरांना सांगणारे संत होते. सर्वसामान्याची लोकभाषा आपल्या साहित्यनिर्मितीसाठी त्यांनी वापरली. ज्ञानेश्वरी, अनुभावमृत, चांगदेव पासष्टी आणि अभंगवाणी अशी विविध साहित्यनिर्मिती त्यांनी केली.

ज्ञानदेव हे तत्त्वज्ञ, महात्मा, सुधारक, श्रेष्ठ साहित्यिक, संघटक व लोकसखा होते. म्हणून या कादंबरीतील ही मुख्य व्यक्तिरेखा महत्त्वाची असल्याचे दिसून येते.

**५.२. ६. सोपानदेव :**

सोपान हा विठ्ठल-रुक्मिणी यांचा तृतीय पुत्र असून तो दिसण्यास मातृमुखी होता. तसेच 'सोपान' हे नाव ठेवण्यामागील त्यांच्या वडिलांचा हेतू पुढीलप्रमाणे व्यक्त झाला आहे, ''आध्यात्मिक क्षेत्रातील आत्मज्ञानाची साधना उंच-उंच शिखरे असलेल्या पर्वतासारखी असते. विज्ञान, विपर्यास, अज्ञान, अनवधान, मोह, माया इत्यादीच्या दऱ्याखोऱ्यांनी हा पर्वत व्यापलेला असतो. घनदाट अरण्यान व्यापल्यासारखी त्याची अवस्था असते. हे सर्व करण्यासाठी खडतर वाटचाल करावी लागते. ही वाट हळूहळू टप्प्याटप्प्यांनी अधिकाधिक उंचावर, उंचावरून उत्तुंगतेवर नेणारी असते. ती अनवट वाट चालताना आपण एकाकी असतो. सतत एकाग्र दृष्टी ठेवून एक-एक टप्पा गाठत हा अनेक टप्प्यांचा सोपान चढला तरच अपेक्षित स्थळी जाऊन आपण पोहोचू शकतो. ह्या सोपानाचे सतत भान राहावे, एकाग्र साधनेचे महत्त्व डोळ्यांसमोरुन हलू नये म्हणून तिसऱ्या मुलाचे 'सोपान' असे जगावेगळे नाव ठेवले.''[१२]

विठ्ठलपंतांनी देहांत प्रायश्चित घेतल्याशिवाय त्यांच्या मुलांची मुंज करावयाची नाही असा निर्णय आळंदीच्या ब्राह्मण मंडळीनी धर्मसभेत घेतला होता. तेव्हा तो आपल्या

वडिलांना असे म्हणाला, ''बापू, मलाही मुंज नको, मला तुम्ही हवे आहात''[१३] अशा प्रकारे तो ही आपल्या भावंडांप्रमाणे त्यांना म्हणाला आणि त्यांच्या गळ्यास मिठी मारुन दु:खी अंत:करणाने रडत होता. तसेच काही दिवसांनी विठ्ठल-रुक्मिणी देहांत घेण्यासाठी घरातून निघून गेल्यावर सोपान दोन दिवस आक्रोश करीत होता.

एके दिवशी सर्व भावंडे अंगणात बसल्यावर तो त्यांना म्हणाला,''बापू निर्दयच वागले. त्यांनी एकट्यालाच देहांत प्रायश्चित सांगितलं होतं. त्यांना ते आम्ही मोठ झाल्यावर सवडीन घेता आल असत. एवढी घाई करण्याच काहीच कारण नव्हत. बर घाई केली ती केली आणि कारण नसताना आईलाही घेऊन गेले. आमचा विचार कुणीच के ला नाही.''[१४] अशाप्रकारे त्याने उद्‌गार काढल्यावर निवृत्तीने त्यास प्रेमाने जवळ घेऊन आई-वडिलांविषयी असे बोलायचे नाही, असे त्याला समजावून सांगितले. एकदा वरवंटी गावाजवळून प्रवास करताना एका बाईच्या अंगात आलेल पाहून तो खूप घाबरला होता. घरगुती कामामध्ये मुक्ताला तो मदत करून तिचे काही चुकले तर समजावून सांगत होता.

ज्ञानदेव दोन दिवस झोपडीची ताटी लावून आतमध्ये बसल्यामुळे त्यांना ताप आला होता. त्यावेळी ताप कमी होण्यासाठी तो मदत करीत होता. तसेच त्याने कापडाची घडी कपाळावर ठेवण्यास तयार केली होती. त्यानंतर काही दिवसांनी ज्ञानदेवास बरे वाटल्यामुळे सर्वांना आनंद झाला होता. पण या आजारपणाचे मूळ कोणते असावे याबाबत तो आपल्या भावंडाना असा सल्ला देतो,''मला वाटत, या सगळ्याच मूळ विसोबा काकाच आहेत. ते दुष्ट गृहस्थ आहेत. आळंदीतच राहतात. त्यामुळ आपण त्यांना नेहमी टाळलेलं बरं. पिंपळाच्या पारावर त्यांच टोळक नेहमी संध्याकाळी असतं. त्यावेळी आपण आपल संध्याकाळी पिंपळपाराकड न गेलेल बरं, दुसऱ्या वाटेन सिद्धबेटावर जायचं यायचं.''[१५] सच्चिदानंदबाबा आळंदीस 'ज्ञानेश्वरीची दुसरी' अंतिम प्रत घेऊन आल्यावर त्याने त्यांचे स्वागत केले आणि आळंदीच्या आसपासचा परिसर त्यांनी दाखवून तेथील इतिहास ही त्याने सांगितला. पुढे काही दिवसांनी संतमेळा तीर्थयात्रा पूर्ण करून आळंदी येथे आल्यावर त्यानेही इतराप्रमाणे आपले मनोगत आनंदाने व्यक्त केले.

ज्ञानदेवांनी संजीवन समाधी घेण्याची इच्छा व्यक्त केल्यावर त्यांना खूप दु:ख झाले होते. तसेच शेवटी ज्ञानदेव समाधी घेण्यास समाधीस्थानाकडे जात असताना त्याने त्यांच्या कपाळाला केशरी गंध लावून स्वत: तयार केलेला पुष्पहार त्यांच्या गळ्यात घातला आणि नमस्कार करून त्यांना मिठी मारली. तसेच तो 'देवदादा' असे मोठ्याने म्हणत रडू लागला.

**५.२.७. हैबती :**

हैबती हा आळंदी गावचा असून तो सिद्धोपंत कुलकर्णी यांची शेती खंडाने करणारा प्रामाणिक शेतकरी होता. त्याला पत्नी, दोन मुली, तीन मुले, बहिणी, आई-वडील, दोन भाऊ असा त्याचा एक परिवार होता. या सर्व मंडळीवर त्यांचे प्रेम होते. तसेच ही सर्व मंडळी सिद्धोपंताच्या शेतात काम करीत होती. हैबतीने शेतात एक घर बांधले असून त्या घराजवळ दोन मोठ्या खोप्या घातल्या होत्या. त्यातील एका खोपीत जनावरे व औजारे होती. तर दुसरी खोपी माणसांना बसण्यासाठी केली होती. हैबतीने नेमून दिलेली सर्व कामे सर्वजण करीत होते. तसेच शेतात कुळवटी, नांगरटी, सडवेचणी व बांध घालणे इत्यादी कामे सर्वजण करीत होते. शेतात दोन विहिरीना पाणी असल्याने ते बारमाही पिके घेत होते. त्याच्याजवळ बैलांच्या तीन जोड्या, गायी, म्हैशी, कुत्री, मांजरे इत्यादी शेतमळ्यात बघण्यासारखी होती. हैबती विठ्ठलपंताना शेतकऱ्यांच्या जीवनाविषयाची दु:ख पुढीलप्रमाणे सांगतात, ''धाकटं धनी, शेतकऱ्याचं जगणं हे असचं असत. सगळ जन्म रानावनातच जातो. त्यामुळं तिथला माणूस तुम्हाला रानमाणसारखाच दिसणार सगळी उन्हाताणातच राबत्यात, म्हणून काळीबेंदरी झालेली असत्यात सावलीला, घरात बसून शेतकऱ्याला काम करायला येत न्हाईत. वाऱ्यावादळात, उन्हात, वावटळ्यात राबावं लागतंय. म्हणून अंगावर रोजच घामाची आंघोळ हुती. तिच्यापुढ पाण्याची आंघूळ फिकी पडती.''[१६] सिद्धोपंत व त्यांचे कुटुंब पाहुण्यांच्या व वतनांच्या गावी हैबतीच्या बैलगाडीतून प्रवास करीत होते. ज्यावेळी विठ्ठलास आळंदीच्या ब्राह्मणांनी 'बहिष्कृत' केले. त्यावेळी सिद्धबेटावर हैबतीने त्यांच्यासाठी झोपडी बांधून दिली. तसेच त्यांना वेळोवेळी त्यांचे कुटुंब मदत करीत होते. त्याचप्रमाणे त्यांच्या चारी मुलांनाही ते मदत करीत होते आणि ते शेतातील भाजीपाला व धान्य विठ्ठलास श्रद्धेने देत होते.

हैबती हा श्रद्धाळू वृत्तीचा असल्याने तो शेतातील पिकांची कापणी करण्याअगोदर पूजा करीत होता. तसेच शेतांच्या औजारांची पूजा, बेंदराला बैलांची पूजा, अमावस्येला म्हसोबाची पूजा व गुऱ्हाळाच्यावेळी ऊसाचा पहिला रस भूमीला अर्पण करीत होता. त्याचबरोबर त्यातील थोडा रस विहीरीत ओतून, थोडा देवांना अर्पण करीत होता. ज्यावेळी विठ्ठल – रुक्मिणी हे देहांत प्रायश्चित घेण्यासाठी गेल्यावर तो खूप दु:खी झाला होता. तसेच ज्ञानदेव समाधी घेणार असल्याने सर्व संत मंडळी सिद्धबेटावर एकत्र आले होते. तेव्हा त्यांच्या भोजनाची सर्व व्यवस्था हैबतीने केली होती. त्याचप्रमाणे ज्या गुहेत ज्ञानदेव समाधी घेणार होते. ती गुहा हैबती व त्याच्या तीन मुलांनी उकराउकरी करून सपाट केली होती. जेव्हा ज्ञानदेवांनी समाधी घेतली. तेव्हा हैबती व त्यांच्या कुटुंबातील स्त्रिया खूप रडल्या. अशाप्रकारे यादवांना हैबती व त्यांच्या कुटुंबाचे जीवन रेखाटण्यात यश आले आहे. या कादंबरीतील हैबतीची व्यक्तिरेखा महत्त्वाची आहे.

### ५.२.८. सच्चिदानंदबाबा :

हे नेवासी गावचे असून तेथील कुलकर्णीपण त्यांच्याकडे होते. ज्ञानदेवादि भावंडे नेवासे येथील धर्मशाळेत सव्वा वर्षे राहण्यास आल्यावर त्यांची चौकशी करण्यास पाटलांनी त्यांना सांगितले होते. म्हणून ते सुरूवातीस आठ दिवस त्यांची चौकशी करीत होते. पण एकेदिवशी सकाळी त्यांना अचानकपणे अस्वस्थ वाटू लागल्याने ते धर्मशाळेकडे गेले नाहीत. तेवढ्यात एका पुजाऱ्याने पंत ठेच लागून रस्त्यात पडल्याचे ज्ञानदेवांना सांगिल्यावर ते निवृत्तीला बरोबर घेऊन पंताच्या घरी गेले. तेव्हा दारातच पंताच्या देहावर पांढरे वस्त्र घातलेले होते. तसेच लोकांची गर्दी त्यांच्या दारात झालेली होती आणि प्रत्येकजण त्यांना नमस्कार करीत होते. ज्ञानदेवांनी त्यांच्या शरीरावरून हात फिरविल्यावर त्यांची त्वचा गरम असल्याचे जाणवले म्हणून त्यांनी त्यांच्या अंगावरील वस्त्र काढले आणि ते मनातल्या मनात मंत्र पुटपुटू लागले. त्यानंतर त्यांनी खोबरेल तेल त्याच्या शरीरावर चोळले आणि थोड्या वेळाने पंत कन्हत असलेला आवाज त्यांना आला. तसेच पंत 'राम कृष्ण हरी, राम कृष्ण हरी! ' असे बोलू लागल्यावर लोकांच्या लक्षात आले की पंत जिवंत झाले. म्हणून त्यांनी

ज्ञानदेवांचा जयघोष केला. त्यानंतर पंतानी ज्ञानदेवांना नमस्कार केला. तसेच त्यांच्या डोळ्यातून अश्रू येत होते. पण त्यांच्या घरात आनंदी वातावरण झाले होते.

पुढे काही दिवसांनी पंतानी नेवासे येथील सभामंडपात पंचक्रोशीतील जमलेल्या लोकांना ज्ञानदेवादि भावंडांची ओळख करून दिली आणि त्यांनी पुढीलप्रमाणे मनोगत व्यक्त केले. ''ज्ञानदेवांनी मला नवी दृष्टी दिली. नवी माणुसकी दिली. जगाकडं कोणत्या नजरेन पाहाव, याची नजर दिली. मी एक संशयात्मा होतो, हे मला दाखवून दिलं. माझ्यातील अहंकाराचा दुष्ट पशू त्यांनी हळुवारपणे नष्ट केला आणि मला माणसांत आणलं. माझा नवा जन्म झाला ! माझ्यातील उद्धटपणा जाऊन माझ्यात माणुसकीची अमृत फळे देणाऱ्या अजाण वृक्षाची रुजवण केली. या जन्मातच माझ्यातील स्वत:ला फार शहाणा समजणारा पण मुलत: दुष्ट आणि धूर्त असलेला ऐटबाज सच्चिदानंदपंत कुलकरणी नष्ट झाला आणि नम्रतेनं, भक्तिभावानं आणि सचोटीनं वागणारा 'सच्चिदानंद बाबा' जन्माला आला. माझा हा पुनर्जन्म आहे. माझ्यातील 'पंत' आठ दिवसांपूर्वी मेला आणि मी आता 'बाबा' चं नवं रूप घेऊन जन्माला आलो आहे. ज्ञानेश्वर महाराजांनीच मला हा नवा जन्म, पुनर्जन्म दिला आहे. आता 'ज्ञानेश्वर' हीच माझी सर्वार्थानं माऊली झालेली आहे. तिच्या सेवेत मी आता माझा 'सच्चिदानंद बाबा' चा जन्म सार्थकी लावणार आहे.''[१७] ज्ञानदेवांनी भगवद्गीतेवर मराठी भाष्य लिहून ते गीतेचे वाचन श्रोत्यांसमोर करीत. त्यावेळी सच्चिदानंदबाबा 'भावार्थ दीपिकेचे' लेखन करीत होते. पुढे सव्वा वर्षानी ग्रंथाचे लेखन पूर्ण झाल्यावर ज्ञानदेवांनी त्यांचे आभार मानले आणि ज्ञानदेवादि भावंडे नेवासीहून आळंदीला निघाल्यावर पंताच्या डोळ्यात पाणी आले. पुढे काही वर्षानी संतमेळा तीर्थाटन करताना नेवासे येथे आल्यावर त्यांनी आदरपूर्वक सर्वांना भोजन घातले. शहाणा, नम्रतेने व भक्तिभावाने वागणारा सच्चिदानंदबाबा ही व्यक्तिरेखा सादर कादंबरीत चित्रित झाली आहे.

### ५.२.९. चांगदेव :

चांगदेव हे एक प्रख्यात हटयोगी म्हणून ओळखले जातात. ते अतिशय तेजस्वी आणि देखणे पुरुष असून कैलासपती शंकराची उपासना करीत होते. तापी नदीच्या तीरावर त्यांचा आश्रम असून या आश्रमात ते शेकडो शिष्यासह राहत होते. त्याने चौदा वर्षे तपश्चर्या

करून चौदा विद्या व चौसष्ट कला प्राप्त केलेल्या होत्या. ते श्रृति, न्याय, व्याकरण, ज्योतिष, रसविद्या, नाडीज्ञान, धनुर्विद्या, कामशास्त्र, गायनकला इत्यादींमध्ये निपुण झालेले असून ते अनेक चमत्कार करून दाखवत होते. ''त्यांच्या औषध-उपचारांनी अंधळ्याला दिसू लागत. कर्णबधीर माणसाला ऐकू येऊ लागतं कुष्ठरोग्याचे पांढरे डाग जाऊन त्वचा पूर्वीसारखी होते. वांझोट्या स्त्रीला मुलं होतात. असे अनेक चमत्कार ते योगसिद्धीच्या जोरावर आणि रसविद्येच्या जाणकारीमुळं करू शकतात. त्यामुळ जनलोकांची, आजारी-रोग्यांची, प्रापंचिकांची गर्दी त्या आश्रमात नेहमीच असते''[१८] अशाप्रकारे ही माहीती नरेंद्रपंतानी आश्रम पहायाला आलेल्या आपल्या जावईबापू महेशशास्त्रीना सांगितली होती.

दररोज सकाळी पहिल्या प्रहरी शिष्यांनी त्यांची आरती व पूजन केल्यावर ते उभे राहून सर्वांना आशीर्वाद देत होते. एकदा त्याना भेटण्यास आलेल्या पैठणच्या महेशशास्त्रीकडून त्यांनी ज्ञानदेवाविषयी सर्व माहिती विचारली. तेव्हा शास्त्रीबुवांनी विठ्ठलपंताच्या जन्मापासून ते ज्ञानदेवादि भावंडांना मिळालेल्या शुद्धिपत्रापर्यंतची सर्व माहिती त्यांना सांगितली. ज्ञानदेवांनी महिषामुखी वेद बोलविल्यामुळे ते साक्षात विष्णुचा अवतारच असावेत म्हणून ते त्यांचे दर्शन घेण्याचे ठरवितात. तसेच त्या दिवशी ते अस्वस्थ होतात आणि ज्ञानदेवांना भेटण्याविषयीची इच्छा ते तीन शिष्याजवळ व्यक्त करतात. तेव्हा त्यातील एक शिष्याने स्वत:हून ज्ञानदेवांना न भेटण्याचा सल्ला दिल्याने त्यांनी ज्ञानदेवांना पत्र पाठविण्याचे ठरविले. पण त्या पत्रामध्ये मायना काय लिहावा हा प्रश्न त्यांना पडल्याने शेवटी कोरेच पत्र बंद थैलीत घालून शिष्याद्वारे त्यांना पाठविले. ती पत्राची थैली घेऊन शिष्य आळंदीस ज्ञानदेवांच्याकडे आले. तेव्हा त्या थैलीतील कोरे पत्र पाहून ज्ञानदेवादि भावंडे चकित झाले. त्यानंतर ज्ञानदेवांनी त्या पत्राचे उत्तर 'चागदेव पासष्टी' लिहून त्यांना शिष्याद्वारे पाठविले. ते पत्र चांगदेवांनी दोन - तीन वेळा वाचले. पण त्यातील मजकूर त्यांना कळाला नाही आणि त्या पत्राचा स्पष्ट बोधही झाला नाही. तसेच ते तत्त्वज्ञ असावेत असेही त्यांना वाटले. म्हणून त्यांनी ज्ञानदेवांची भेट घेण्याचा निर्णय घेतला.

चांगदेव आपल्याबरोबर शंभर शिष्य, पाळलेला वाघ व साप घेऊन ज्ञानदेवांना भेटण्यास आळंदीस येतात. तेव्हा ज्ञानदेवादि भावंडे त्यांचे स्वागत करतात. त्यानंतर चांगदेव

ज्ञानदेवांना पुढीलप्रमाणे म्हणतात, ''आपली तपश्चर्या मोठी आहे. आपल्या क्षेत्रातील आपली उपासना काय आहे. अध्ययन काय, त्यामुळं मिळणाऱ्या सिद्धी कोणत्या, आपला दिनक्रम कसा, हे सर्व समजून घ्यावं, आत्मसात करण्याचा प्रयत्न करावा म्हणून मी आपल्या चरणापाशी आलो आहे.''[१९] अशाप्रकारे चांगदेवांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावर ज्ञानदेवांनी त्यांना उत्तर दिले की, येथे अनेक दिवस वास्तव्य केल्यावरच आपणास विद्या आत्मसात करता येईल. म्हणून त्यांनी आळंदीत काही दिवस राहून विद्या आत्मसात केली. त्यानंतर त्यांच्या स्वभावात आमूलाग्र परिवर्तन झाल्याने तापीतीरी जाण्यासाठी ते ज्ञानदेवांदि भावंडांकडे परवानगी मागतात आणि मुक्ताईच्या चरणावर मस्तक ठेवून आशीर्वाद घेतात. अहंकारी स्वभावामुळे माणसाची काय अवस्था होते याचे चांगदेव हे उत्तम उदाहरण आहे.

### ५.३ 'लोकसखा ज्ञानेश्वर' मधील स्त्री व्यक्तिरेखा :

### ५.३.१. नीराबाई :

नीराबाई या आपेगावच्या गोविंदपंत कुलकर्णी यांच्या पत्नी व विठ्ठलपंताच्या मातोश्री आहेत. त्यांची सुरुवातीची दोन-तीन अपत्ये अकालीच वारली होती. विठ्ठल हा त्यांचा एकुलता एक मुलगा असल्याने त्यांच्यावर त्या खूप प्रेम करीत होत्या. तसेच त्या त्यांचे सर्व बालहट्ट पुरवीत होत्या आणि आनंदाने त्यांचे लाडही करीत होत्या. त्याचबरोबर विठ्ठलाची मुंज झाल्यावर तिने त्याला विद्यार्जनासाठी मामा घरी पैठणला पाठविले. त्यानंतर तो बारा वर्षांनी शिक्षण पूर्ण करून आपेगावला आला. तेव्हा तिने आनंदाने दसरा सण पुढीलप्रमाणे साजरा केला, ''नीराबाईनी मोठ्या उत्साहानं दसरा सण साजरा केला. विठ्ठलचं गुरुकुलातील विद्यार्जन पूर्ण झाल्यामुळं आणि घरात उत्साहाचं वातावरण निर्माण झाल्यामुळं त्यानं सीमोल्लंघनाच्या निमित्तानं पागोटे बांधायला सुरुवात केली पागोटं बांधल्यावर सोनं लुटून झाल्यावर तो दारात मोठ्या डौलात उभा राहिला. तेव्हा त्याच्या ऐन उमेदीतल्या पुरुषी तरुण व्यक्तिमत्त्वाला निराबाईनी डोळे आणि मन भरून पाहिलं. पंचारतीनं ओवाळलं, वात्सल्याने भाकरीचा तुकडा ओवाळून टाकला. त्याच्या मुखात प्रेमानं लाडवाचा तुकडा सारला.''[२०] विठ्ठलपंताच्या विवाहासाठी तिने आपल्या माहेरची बीडकरांची सुंदर मुलगी त्यांना सुचविली

होती. तसेच ती आपली सून व्हावी असे तिला वाटत होते. पण विठ्ठलाने दीड एक वर्षे विवाह न करण्याचे ठरविल्याने त्या खूप दु:खी झाल्या होत्या. त्यानंतर पुढे दोन वर्षांनी आई-वडिलांना न सांगता विठ्ठल विवाह करून पत्नीसह आपेगावला त्यांना भेटण्यास गेला. तेव्हा आपल्या मुलाने आपणास विवाहास सांगितले नाही. म्हणून दु:खी न होता त्यांनी आनंदाने त्यांचे स्वागत केले. विठ्ठलपंताचा विवाह होऊन दहा-बारा वर्षे झाली होती. पण त्यांना पुत्रप्राप्ती नसल्याने त्या खूप दु:खी झाल्या आणि त्यात तिचा मृत्यू झाला. पतीच्या व मुलांच्या सुख दु:खात सामील होणारी नीराबाई भावनाप्रधान स्वभावाची व्यक्तिरेखा आहे.

**५.३.२. उमाबाई :**

उमाबाई ही सिद्धोपंत कुलकर्णी यांची पत्नी व रुक्मिणीची आई होती. रुक्मिणी ही त्यांची एकुलती एक मुलगी असल्याने त्या मुलाप्रमाणे तिच्यावर प्रेम करीत होत्या. तसेच आपल्याला मुलगा नाही याची खंत तिला कधीही वाटली नाही. त्या अडीअडचणीच्या वेळी पतीला योग्य सल्ला देत होत्या आणि सिद्धोपंतास तो पटतही होता.

एकेदिवशी सिद्धोपंतानी भोजनासाठी विठ्ठलाला घरी बोलविले होते. तेव्हा उमाबाईनी दारातच त्यांच्या पायावर पाणी घालून भाकरीचे तुकडे ओवाळून टाकले आणि घरात आल्यावर त्यांची दृष्ट काढली. अशा पद्धतीने घरी आलेल्या विठ्ठलपंताचे स्वागत त्यांनी केले. तसेच भोजनानंतर विठ्ठलपंताच्या आई-वडिलांची व घराण्याविषयी तिने चौकशी केली. त्याचबरोबर विठ्ठल हा आपला आप्तेच आहे. अशा भावनेने आणि आपुलकीने तिने संपूर्ण चौकशी केली. त्यानंतर पुढे काही दिवसांनी विठ्ठल-रुक्मिणीचा विवाह ठरल्यावर त्या वतनाच्या गावातील संबंधित मंडळीना व गणगोतांना आमंत्रण देण्यास स्वत: गेल्या.

उमाबाई श्रद्धाळू वृत्तीच्या असल्याने विवाहानंतर आपेगावला बैलगाडीतून सर्व मंडळीच्याबरोबर प्रवास करताना त्या उगवत्या सूर्यास नमस्कार करून पुढीलप्रमाणे म्हणाल्या, ''देवा, सूर्यनारायणा, आमचा प्रवास सुखा-सुरक्षेचा कर रे, बाबा !''[२१] अशाप्रकारे तिने सूर्यदेवास नमस्कार करुन आशीर्वाद मागितला. विठ्ठलपंतानी संन्यास घेतल्यावर रुक्मिणीस खूप दु:खी झाल्याने त्या तिला पुढीलप्रमाणे म्हणाल्या, ''नको बाळे,

असा त्रागा करून घेऊ, प्राणत्यागाचा विचारसुद्धा मनात आणू नको. मनाने खंबीर हो ! अनेकजणी विधवाजीवन जगतच असतात ना ? त्यापेक्षा हे काही वाईट नाही तुला वाटतं तसं लाजिरवाणं तर मुळीच नाही. 'ते' आपल्या कर्मानं संन्यासी होण्यासाठी निघून गेले.''[२२] अशाप्रकारे तिने आपल्या कन्येस धीर देण्यासाठी हा सल्ला दिला. तसेच तिच्या खंबीर स्वभावामुळे रुक्मिणी व सिद्धोपंत सावरले होते. ती नातंवंडावर खूप प्रेम करीत असल्याने त्यांच्या मुंजीची तिला काळजी वाटत होती. जेव्हा मुलांच्या मुंजीसाठी आळंदीतील धर्मसभेने विठ्ठलपंताना देहांत प्रायश्चित घेण्यास सांगितले होते. तेव्हा ही बातमी समजल्यावर तिला फार मोठा मानसिक धक्काच बसला आणि त्यातच तिचा मृत्यू झाला. अशाप्रकारे प्रेमळ स्वभावाची व श्रद्धाळू वृत्तीची ही व्यक्तिरेखा या कादंबरीत बरेच काही सांगून जाते.

**५.३.३. रुक्मिणी :**

रुक्मिणी ही आळंदीतील सिद्धोपंत व उमाबाई यांची एकुलती एक कन्या असून तिच्यावर ते मुलाप्रमाणे प्रेम करीत होते. रुक्मिणी निर्मळ मनाची सात्त्विक वृत्तीची, सुंदर आणि नाजूक मुलगी होती. तिचा गळाही गोड असल्याने बोलताना किणकिण घंट्या वाजल्यासारखे वाटत होते. तसेच ती गावातील गणेश मंदिरात आईबरोबर भजन म्हणत होती. त्याचबरोबर तिला गौरी-पंचमीच्या सणाला गाणे म्हणण्यास मैत्रिणी आग्रह करीत होत्या. तिचे डोळे काळेभोर मोठे असल्याने ती समोरच्या व्यक्तीचे लक्ष वेधून घेत होती. तसेच ती अतिशय गुणी मुलगी होती.

एकेदिवशी सिद्धोपंतांना आळंदीत सिद्धबेटावर एक तरुण भेटला होता. त्यांच्याशी ओळख झाल्यानंतर त्यांना भोजनासाठी घरी घेऊन आले. तेव्हा त्यांच्या पत्नीने व कन्येने घरी त्या तरुणाचे स्वागत केले. तसेच तिने रव्याचे दोन लाडू वाटीतून आणून त्यांच्यासमोर ठेवले व त्यांना नमस्कार केला. थोड्या वेळाने भोजनाचा कार्यक्रम झाल्यानंतर उमाबाईनी त्यांची सर्व चौकशी केली आणि काही दिवसांनी सिद्धोपंतानी आपल्या कन्येशी विवाह करण्यासंबंधी त्यांना विचारले होते. विठ्ठलपंत तिच्या बरोबर विवाह करण्यास तयार

झाल्यावर त्यांनी वधु-वरांची कुंडली व गुण बघितले. तसेच विवाह सोहळा ठरलेल्यावेळी वधूच्या घरी मोठ्या थाटात पार पडला.

विवाहानंतर प्रथमच ती पतीबरोबर सासरी आपेगावला आल्यावर विठ्ठलपंतांच्या आई-वडिलांनी तिचे स्वागत केले आणि तिनेही आपल्या सासू-सासऱ्यास नमस्कार केला. तसेच पती-पत्नी जोडीने गावातील शिवमंदिरात आणि राधाकृष्णमंदिरात दर्शनासाठी गेले. त्याचबरोबर ती पतीबरोबर पंढरपुरास पांडुरंगाच्या दर्शनासाठीही गेली होती. तिचा विवाह होऊन बरीच वर्षे झाली तरी अपत्य प्राप्ती नसल्याने ती चिंताग्रस्त झाली होती. तसेच ती अनेक व्रते व उपाय अपत्य प्राप्ती होण्यासाठी करीत होती. पण तिला त्याचा काहीही उपयोग झाला नाही.

पुढे काही वर्षांनी नातवंडाची वाट पाहून तिच्या सासू-सासऱ्याचे निधन झाले होते. तसेच विठ्ठलपंतानी अपत्य प्राप्ती नसल्याने संन्यास घेण्याचा निर्णय घेतल्यावर तिने आपल्या पतीस पुढीलप्रमाणे सल्ला दिला, ''पुन्हा असं बोलू नका, डोक्यात राख घालून कुठं निघून गेलात तर लोक तुम्हाला पळपुटे म्हणतील आणि दुसरं असं की, मला पत्न म्हणून जन्माची गाठ मारून स्वत:बरोबर अर्धांगिनी म्हणून जोडून घेतलीत त्या माझा काही विचार करणार की नाही ? बाई माणसाला एकटं वाऱ्यावर सोडून जाताना आपल्या हातून एक स्त्री हत्या होणार आहे, हे लक्षात ठेवा. तुम्ही गेलात तर मी पाठीमागं एक दिवस राहणार नाही विहिरीत नाही तर नदीत मी जीव देईन..... पुन्हा हा विषय काढू नका.''[२३] विठ्ठलपंत एके दिवशी संन्यास घेण्यासाठी घरातून निघून गेल्यावर ती खूप दु:खी झाली आणि ती कपाळावर छातीवर हात मारून रडू लागल्याने बेशुद्ध झाली. तेव्हा तिच्या आईने समजुत काढून तिला धीर देण्याचा प्रयत्न केला.

पुढे काही वर्षांनी काशी-वाराणशीचे रामानंदस्वामी आळंदीत आल्यावर त्यांच्या दर्शनासाठी ती मैत्रिणीबरोबर गेली होती. तेव्हा स्वामींनी तिला पुढीलप्रमाणे आशीर्वाद दिला, ''पुत्रवती भव ! तुझ्या पोटी ब्रह्मा, विष्णू, महेश, आदिशक्ती जन्म घेवोत !''[२४] अशाप्रकारे आशीर्वाद दिल्यानंतर तिच्या डोळ्यातून पाण्याचा धारा येत होत्या. त्यावेळी

स्वामीने तिला सर्व गोष्टी समजावून सांगितल्या आणि त्यांच्या मदतीने तिने आपल्या पतीस संन्यासाश्रमातून परत आळंदीस आणले. विठ्ठलपंतानी गृहस्थाश्रमात प्रवेश केला म्हणून आळंदीतील ब्राह्मण मंडळीनी धर्मसभा घेऊन त्यांच्यावर बहिष्कार टाकला. त्यामुळे ते पत्नीसह सिद्धबेटावर राहण्यास गेले. तेव्हा तेथे तिला निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान व मुक्ताई अशी चार मुले झाली आणि तिचे या सर्वांच्यावर खूप प्रेम होते.

पुढे काही वर्षांनी ही मुले मोठी झाल्यावर त्यांची मुंज करण्यासंबंधी आळंदीत धर्मसभा घेण्यात आली. तेव्हा या धर्मसभेने निर्णय दिला की, विठ्ठलपंतानी देहांत प्रायश्चित घेतल्यावरच या मुलांच्या मुंजीचा विचार करण्यात येईल. ही बातमी तिला समजताच अर्धांग वायूचा झटका आल्याप्रमाणे तिची अवस्था झाली आणि विठ्ठलपंतानी देहांत प्रायश्चित घेण्याचे केल्यानंतर ती त्यांना म्हणाली, ''प्रायश्चित घेण्याचा तुमचा निर्णय ठाम दिसतो. असं असेल तर मी तुमच्यामागं कशाला जिवंत राहू ? डोळ्यांदेखत मुलांच्या कल्याणासाठी आपण देहांत प्रायश्चित घेत आहात तुमच्या माग मी जिवंत राहिले तर सगळा समाज, हा गाव मला कुलटा ठरवील. स्वत:च्या डोळ्यांदेखत नवऱ्याला एकट्याला खुशाल मरू दिलं म्हणून मी पापिणी ठरेन. माझ्या वाट्याला ही नामुष्की नको आहे. धर्मपत्नीला पतिनिधनानंतर सती जाण्यातच सार्थक वाटत असतं. कारण त्यात तिची पतिनिष्ठा सहचारिणीपण सिद्ध होतं. म्हणून तुमच्याबरोबर सहचारिणी म्हणून देहांत प्रायश्चित मलाही घ्यायचं आहे.''[२५] अशाप्रकारे तिने स्पष्ट आपला निर्णय त्यांना सांगितला. त्यानंतर काही दिवसांनी घरी मुलांना पत्र लिहून ठेवून पती-पत्नी दोघेही त्रिवेणी संगमाच्या प्रयाग तीर्थांवर देह विसर्जित करण्यास निघून जातात.

### ५.३.४. मुक्ताई :

मुक्ताई ही विठ्ठल-रुक्मिणी यांची कन्या असून ती ज्ञानदेवांची धाकटी बहीण आहे. विठ्ठलपंत प्रेमाने तिला 'मुक्ताई' म्हणत होते. तसेच आपल्या मुलगीचे नाव 'मुक्ती' ठेवण्यामागील हेतू ते सांगतात, ''चौथी मुलगी हे 'मुक्ती' चे प्रतीक होती. आत्मसाधनेचा उत्तुंग सोपान चढून गेल्यावर सिद्धावस्था प्राप्त होते. ही अवस्था जन्म-मृत्यू, सुखदु:खे,

मायामोह, राग, लोभ इत्यादीतून चित्ताला, पर्यायाने जीवनाला मुक्त करणारी आणि परमेश्वर स्वरूपात आत्मस्वरूप विलीन झाल्याचा, परमात्म्यात जीवनात्मा एकरूप झाल्याचा साक्षात्कार घडवणारी असते. म्हणून चौथ्या अपत्याचे नाव 'मुक्ती' ठेवले.''[२६] अशाप्रकारे विठ्ठलपंतांनी अर्थपूर्ण तिचे नाव ठेवले होते. रुक्मिणीने तिला स्त्रीने जगात कसे वागावे, भावांना कसे सांभाळावे, चारित्र्य कसे जपावे व सर्वांच्यावर प्रेम कसे करावे. असे तिने तिला समजू लागल्यावर सांगितले होते. तसेच तिला वाचताना काही समजले नाही तर विठ्ठलपंत सांगत होते.

मुक्ताई आईला स्वयंपाकात मदत करीत होती आणि अन्नपदार्थ कसे तयार करायचे हे शिकत होती. आई-वडिल देहांत प्रायश्चित घेण्यासाठी घरी पत्र लिहून ठेवून गेल्यावर मुक्ताई दोन दिवस रडत होती. तेव्हा ज्ञानदेव व निवृत्ती तिचे मायेने डोळे पुसून तिला जवळ घेत होते. तसेच त्यानंतर ती दोन दिवस जेवली नव्हती. पुढे काही दिवसांनी सर्व भावंडे अंगणात चंद्राकडे बघत बसले होते. तेव्हा अशावेळी आई-बापू पाहिजे होते. असे तिला वाटत असल्याने ती पुढीलप्रमाणे म्हणते, ''बापू निदर्य आहेत ! आम्हाला काहीच कळू न देता निघून गेले. बरं, जायचं तर एकटे गेले नाहीत, आईलाही घेऊन गेले. आपणा सगळ्यांना पोरकं करून, दु:खाच्या उसळत्या कढईत टाकून गेले !''[२७] अशाप्रकारे ती दु:खी मनाने स्वत:शीच बोलत होती. एकदा बैलगाडीतून प्रवास करताना वरवंडी गावाच्या शिवेजवळ गाडी आल्यावर एका बाईच्या अंगात आलेले पाहून ती खूप घाबरली होती. ती आपल्या आई-वडिलाप्रमाणे सर्व भावंडावरही प्रेम करीत होती. तसेच हैबतीच्या कुटुंबातील माणसावरही तिचे प्रेम होते. ज्ञानदेवांना विसोबा चाटी यांनी शिव्या देऊन अपमानित केल्यामुळे ते झोपडीची ताटी लावून दोन दिवस आतमध्ये बसले होते. तेव्हा ज्ञानदेवांनी झोपडीची ताटी न उघडल्यामुळे ती त्यांना पुढीलप्रमाणे म्हणाली, ''तू जर ताटी उघडली नाहीस तर मी अन्नत्याग करून त्या परमेश्वराच्या माहेरी त्याला विचारायला जाईन. तू आम्हाला हवा आहेस, सगळ्या जगाला तू हवा आहेस. तेव्हा स्वत: तरून विश्वाला तारण्यासाठी मनाची ताटी उघड आणि तुझ्या छोट्या आदिशक्ती मुक्ताला जवळ घे. कनवाळू

मिठी घाल. ऊठ, देवदादा, ऊठ ! ताटी उघड.....''[२८] अशाप्रकारे तिने डोळ्यात अश्रू आणून म्हटल्यानंतर ज्ञानदेवांनी ताटी उघडून तिला मिठीत घेतले. तेव्हा त्यांच्या शरीरात ताप असल्याचे तिला जाणवले आणि तो कमी होण्यासाठी तिने त्यांच्या पाठीवर तेल लावून मांडे भाजले.

चागदेवांनी आपला अहंकार बाजूला ठेवून ज्ञानदेवांच्या आज्ञेनुसार मुक्ताईला गुरू मानले. तसेच तिने 'चांगदेव पासष्टी' चा अर्थ त्यांना प्रासादिक भाषेत समजावून सांगितला. त्याचबरोबर तिने त्याला आपला आध्यात्मिक पुत्रही मानले. त्यानंतर चार-पाच महिन्यांनी चांगदेव आपल्या आश्रमाकडे तिची परवानगी घेऊन परत निघाल्यावर तिने त्यांची दुष्ट काढली. संतमेळ्याबरोबर तीर्थयात्रेचा प्रवास करून आळंदीत आल्यावर तिनेही इतरांप्रमाणे आपले मनोगत असे व्यक्त केले, ''आपली सर्व संतमेळ्याची तीर्थयात्रा ही आनंदयात्रा होती. तीर्थक्षेत्रं ही परमेश्वर दर्शनाची उत्कट स्थळं असतात. आपणास तिथं परमेश्वर उत्कट स्वरूपात भेटतो. त्यामुळं अत्यानंद होतो, या अर्थानं ही आनंदयात्रा होती. पण माझ्या आई वडिलांनीही काशी प्रयाग तीर्थाची यात्रा केली. ती त्यांची एक विलक्षण दु:ख-यात्रा होती. त्या यात्रेची तीव्र आठवण मला या यात्रेत होत होती.''[२९] अशाप्रकारे तिने मनोगत सांगितले आणि ती गंभीर झाली.

ज्ञानदेवांनी संजीवनी समाधी घेण्याचे ठरविले होते. तेव्हा तिने त्यांना त्यापासून परावृत्त करण्याचे प्रयत्न केले होते. पण त्याचा काहीही उपयोग झाला नाही. जेव्हा ज्ञानदेव समाधी घेण्यास समाधिस्थानाकडे निघाल्यावर तिने 'नको ना रे जाऊ' असे म्हणत त्यांना मिठी मारून ती मोठ्याने रडत होती. आई-वडिलाप्रमाणे आपल्या भावंडांवर प्रेम करणारी, समजूतदार प्रवृत्तीची व भक्तिभावाने वागणारी अशी ही महत्त्वाची व्यक्तिरेखा आहे.

### ५.२.५ पार्वती :

पार्वती ही आळंदीतील हैबती या शेतकऱ्याची पत्नी असून ती आपल्या पतीबरोबर शेतात काम करीत होती. सिद्धोपंताच्या घरी विशेष प्रसंगी कार्यक्रम असल्यास अथवा आडीआडचणीच्या वेळी ती मदत करण्यास जात होती. तसेच विठ्ठल-रुक्मिणी सिद्धबेटावर

राहण्यास आल्यावर ती त्यांना शेतात पिकलेला भाजीपाला, फळफळावळ, कडधान्य व रोज ताजे दूध आणून देत होती. त्याचबरोबर त्यांना कधी-कधी दळण-कांडण, जळणासाठी गोवऱ्या व लाकडे ती आणून देत होती. अशाप्रकारे ती त्यांना मदत करीत होती. तेव्हा एक दिवस रुक्मिणी तिला म्हणाली, आम्हाला खूप मदत करतेस. त्यावर ती तिला म्हणाली, ''काय करते हो मी येगळं तुमच्यासाठी ? घरात करते तेच हितं करते. शेतात येतं, तेच आणून देते. पोराबाळांसाठी दळते-कांडते तेच हितंबी करते. तुमच्यासाठी आम्ही काय येगळी गाई-वासरं आणली न्हाईत. दावणीत हाईत, त्येचंच दूध आणते न्हवं ? रोजच्या रोज तुमच्यासाठी न्हवं तर आमच्या पोटासाठी ते दूध तर काढावंच लागतंय आणि रकमाबाय हे समदं तुमच्या शेतमळ्याच्या मातीतनंच आम्हांला मिळतंय.''[३०] अशाप्रकारे तिने तिला व्यावहारिक शहाणपण सांगितले.

उमाबाई व सिद्धोपंत यांचे निरोप ती सिद्धबेटावर रुक्मिणीला सांगत होती. तिला विठ्ठल-रुक्मिणी देहांत प्रायश्चित घेतल्याची बातमी निवृत्तीने सांगितल्यावर ती छातीवर हात मारून रडू लागली. तसेच तिचा हा शोक पाहून चारी मुलांच्या डोळ्यातून अश्रू आले. त्यानंतर थोड्या वेळाने तिने स्वत:ला सावरून त्या चारी मुलांना दूध व तांदळाची कांजी करून दिली. जेव्हा ज्ञानदेवांनी संजीवन समाधी घेतली. तेव्हा ती 'माझ्या लेकरा ।'ऽऽ असे मोठ्याने म्हणत रडू लागली. पार्वती ही निर्मळ व निरपेक्ष मनाची स्त्री होती. तसेच ती सरळमार्गी विचार करणारी असून माणसाला माणूस म्हणून मानणारी होती. अशाप्रकारे ही गौण स्त्री व्यक्तिरेखा रेखाटण्यात आली आहे.

याशिवाय सदर कादंबरीत आलेल्या मुख्य व गौण व्यक्तिरेखेप्रमाणे इतर व्यक्तिरेखाही महत्वाची आहे. यामध्ये प्रामुख्याने मारुती, श्रीधरपंत, नामदेव, गोरा कुंभार, चोखा मेळा, सावता माळी, दत्तोपंत गणू, चिंतामणीशास्त्री, धुडिंराजशास्त्री, केशवशास्त्री, इत्यादी इतर व्यक्तिरेखा या कादंबरीत आलेल्या आहेत. या सर्व व्यक्तिरेखांमुळे ही कादंबरी उठावदार झाल्याचे दिसते.

## ५.४ समारोप :

अशाप्रकारे 'लोकसखा ज्ञानेश्वर' या कादंबरीमध्ये उपरोक्त स्त्री-पुरूष व्यक्तिरेखा आलेल्या आहेत. चरित्रात्मक कादंबरी ही व्यक्तित्त्वप्रधान असल्याने त्या व्यक्तीच्या जीवनातील महत्त्वाचे प्रसंग तपशीलवारपणे सांगणे हे कादंबरीकाराची सर्वात मोठी जबाबदारी आहे. असे त्यांचे प्रसंग सांगितले तरच त्या व्यक्तिचित्रणात जिवंतपणा येतो. तसेच त्या व्यक्तिरेखांची सुख दु:खे व त्यांच्या अंत:करणातील भावभावना कादंबरीकार उलगडून दाखवितो.

'लोकसखा ज्ञानेश्वर' या कादंबरीत सर्वात महत्त्वाची व्यक्तिरेखा म्हणजे 'ज्ञानदेव' ही होय. ही कादंबरी त्यांच्या जीवनचरित्रावर अवलंबून असून त्यांच्याशी निगडित असलेल्या इतर व्यक्तिरेखा या कादंबरीत आलेल्या आहेत. या व्यक्तिरेखा कादंबरीच्या कथानकाला सलगता व उठावदारपणा आणण्यासाठी महत्त्वाच्या आहेत. यानंतर पुढील प्रकरणात सदर कादंबरीचे 'अभिव्यक्ती विशेष' अभ्यासणार आहोत.

## संदर्भ

१. यादव, आनंद, 'लोकसखा ज्ञानेश्वर', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, आवृत्ती दुसरी, सप्टेंबर, २००६, पृ. क्र. ५

२. तत्रैव, पृ. क्र. १५.

३. तत्रैव, पृ. क्र. १७४.

४. तत्रैव, पृ. क्र. १३७.

५. तत्रैव, पृ. क्र. १९७.

६. तत्रैव, पृ. क्र. २३७.

७. तत्रैव, पृ. क्र. ३५२.

८. तत्रैव, पृ. क्र. २२२.

९. तत्रैव, पृ. क्र. ४०६.

१०. तत्रैव, पृ. क्र. ४४०.

११. तत्रैव, पृ. क्र. ४७९.

१२. तत्रैव, पृ. क्र. १३७.

१३. तत्रैव, पृ. क्र. १९८.

१४. तत्रैव, पृ. क्र. २१३.

१५. तत्रैव, पृ. क्र. ३६२.

१६. तत्रैव, पृ. क्र. ५३.

१७. तत्रैव, पृ. क्र. २९६-९७.

१८. तत्रैव, पृ. क्र. ३८२.

१९. तत्रैव, पृ. क्र. ३९२.

२०. तत्रैव, पृ. क्र. ७-८.

२१. तत्रैव, पृ. क्र. ५४.

२२. तत्रैव, पृ. क्र. ११०.

२३. तत्रैव, पृ. क्र. १००.

२४. तत्रैव, पृ. क्र. ११४.

२५. तत्रैव, पृ. क्र. २०४.

२६. तत्रैव, पृ. क्र. १३७.

२७. तत्रैव, पृ. क्र. २१३.

२८. तत्रैव, पृ. क्र. ३५७.

२९. तत्रैव, पृ. क्र. ४४२.

३०. तत्रैव, पृ. क्र. १३१.